RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ९, अंक ३२] सोमवार, मे १५, २०२३/वैशाख २५, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ४८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**शहर विकास विभाग**

महापालिका भवन, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे ४०० ६०२, दिनांक ११ मे २०२३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक ठामपा/शविवि/क्लस्टरसेल/अधिसूचना/१४.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) नुसार (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे.) शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९७/१३१९/सीआर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आहे. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेल्या क्षेत्राची (Excluded portion) विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०१/२७४/सीआर-२८/२००१/नवि-१२, दि. ३ एप्रिल, २००३ अन्वये शासनाने उक्त अधिनियमानुसार मंजूर केली असून ती दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आहे. (यापूढे " उक्त मंजूर विकास योजना " असा उल्लेख केला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत काही बदल करून शासनाने निर्णय क्र. टिपीएस १२९४/१२५९/सीआर-२२२/९४/नवि-१२, दिनांक २८ एप्रिल १९९५ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये विकास नियंत्रण नियमावली मंजुर केली होती व सदर नियमावली दिनांक १ जून १९९५ पासून अंमलात आली होती ;

आणि ज्याअर्थी, तत्कालीन मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये ४४ नागरी पुनरुत्थान आराखडे (यु.आर.पी.) दिनांक ५ मे २०१८ रोजीच्या **शासन राजपत्रामध्ये** अधिसूचित करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय क्र. टिपीएस १८१८/प्र.क्र. २३६/१८/कलम ३७ (१क क) (ग) व कलम २०(४)/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली, मंजुर केली आहे आणि उक्त विकास नियंत्रण नियमावली दिनांक ३ डिसेंबर २०२० पासून अंमलात आली असून सदर नियमावली ठाणे महानगरपालिकेस लागू आहे. (यापुढे "उक्त नियमावली" असा उल्लेख केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, मौजे पाचपाखाडी येथील अंतिम भूखंड क्र. १८६ व १८७ क्षेत्र १२४९७.६९ चौ.मी. हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे आहेत ;

आणि ज्याअर्थी, नागरी पुनरुत्थान योजना क्र.१२, किसन नगर येथील नागरी पुनरुत्थान प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे अंतिम भूखंड क्र. १८६ व १८७ मधील क्षेत्र ठाणे महानगरपालिकेस देणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक २३ मार्च २०२३ रोजी तत्वतः मंजूरी प्राप्त झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक २३ मार्च २०२३ रोजी प्राप्त तत्वतः मंजूरीस अनुसरुन ठाणे महानगरपालिकेच्या मा. प्रशासकीय ठराव क्र. २०५, दि. २७/०३/२०२३ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या नागरी पुनरुत्थान योजना क्र. १२, किसन नगर येथील नागरी पुनरुत्थान प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे अंतिम भूखंड क्र. १८६ व १८७ यांचे एकत्रित क्षेत्रापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेस आवश्यक असलेले क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्र ठाणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अंतिम भूखंड क्र. १८६ व १८७ मधील तत्वतः मंजूरीनुसारचे क्षेत्र व नगररचना योजनेतील या भूखंडालगत असलेल्या ट्रॉली रस्त्याचे क्षेत्र देखील योजना क्षेत्राशी सलग्न होणार असल्याने समूह विकास आराखड्यात समाविष्ट करता येणे शक्य आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्र हे पूर्वी अधिसूचीत केलेल्या यु.आर.पी. क्र. १२ किसननगर च्या हद्दीलगत असल्याने सदरचे क्षेत्र यु.आर.पी. क्र. १२ किसननगर मध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे (यापुढे प्रस्तावाधिन क्षेत्र असा उल्लेख केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.८.१(ii) (b) च्या तरतुदीनुसार नागरी पुनरुत्थान आराखडा तयार करणेचे, अधिसूचित करण्याचे आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा सुधारीत करण्याचे अधिकार आयुक्त यांना असल्याचे नमुद आहे. तसेच उक्त विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. १४.८.१ (i) च्या तरतूदीनुसार योजना क्षेत्रास सलग्न असलेल्या जागा महानगरपालिका आयुक्त योजना क्षेत्रात समाविष्ट करु शकतात ;

आणि त्याअर्थी, उक्त नियमावलीमधील विनियम क्र. १४.८.१ (ii) (बी) अन्वये मला प्रदान अधिकारान्वये, ठाणे शहराच्या हद्दीतील यु.आर.पी. क्र. १२ किसननगरच्या यापुर्वीच्या अधिसूचित हद्दीमध्ये प्रस्तावाधिन क्षेत्र नव्याने अंतर्भुत करून सुधारीत हद्दीचा आराखडा **यु.आर.पी. क्र. १२ किसननगर (सुधारीत क्षेत्र अंदाज १४२.३२८ हेक्टर)** म्हणून अधिसूचित करीत आहे.

सदर अधिसूचित आराखड्याची सुधारीत हद्द दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ खालील ठिकाणी, पुढील तीस दिवसांकरिता ठेवण्यात येत आहे.

(१) उपसंचालक, नगररचना, क्लस्टर सेल, यांचे कार्यालय, माजीवाडा, ठाणे.

(२) शहर विकास विभाग, चौथा मजला, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(३) वागळे प्रभाग समिती कार्यालय.

ही अधिसूचना व अधिसूचीत नकाशा *www.tmctp.thanecity.gov.in* या संकेत स्थळावर सुद्धा उपलब्ध आहे.

**अभिजीत बांगर**, भा.प्र.से.,
आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक ११ मे २०२३.

## THANE MUNICIPAL CORPORATION
## TOWN DEVELOPMENT DEPARTMENT

Mahapalika Bhavan, ChandanWadi, Pachpakhadi,
Thane 400 602, dated the 11th May 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. TMC/TDO/Cluster Cell/Notification/14.—Whereas, the Revised Development Plan of the Thane City has been sanctioned by the Government under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act 1966, (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated 4th October 1999, which has come into force with effect from 22nd November 1999, and the Excluded Part (EP) of the said Development Plan has been sanctioned under the said Act *vide* Government Notification No.TPS/1201/274/CR-28/2001/UD-12, dated 3rd April 2003 which has come into force with effect from the 14th May 2003; (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan") ;

And whereas, the Development Control Regulations of Thane Municipal Corporation has been sanctioned by the Government after making some modifications in draft Development Control Regulations of Thane City *vide* Urban Development Department, *vide* Notification No. TPS 1294/1259/ CR-222/94/UD-12, date 28th April 1995 under section 31(*1*) of the said Act which had come into force with effect from the 1st June 1995 ;

And whereas, in pursuant to the provisions of erstwhile sanctioned Development Control Regulations, 44 Urban Renewal Plans are notified in *Government Gazette* dated 05/05/2018 within the limits of Thane Municipal Corporation ;

And whereas, the Government has sanctioned Unified Development Control and Promotion Regulations *vide* resolution No.TPS-1818/CR236/18/DP&RP/ sec.37(1AA)(c) and sec. 20(4)/UD-13, dated 2nd December 2020 (hereinafter referred to as "the said Regulations") and the said Regulation are in force from dated 3rd December 2020 and are applicable to Thane Municipal Corporation ;

And whereas, final plot No. 186 and 187 of village Panchpakhadi is owned by Municipal Corporation of Greater Mumbai admeasuring 12497.69 sq.mt. ;

And whereas, Municipal Corporation of Greater Mumbai *vide* letter dated 23rd March 2023 has conveyed it's in-principal approval for handing over of part portion of final plot No. 186 and 187 to the Thane Municipal Corporation for the implementation Urban Renewal Scheme ;

And whereas, Thane Municipal Corporation *vide* administrative resolution No. 205, dated 27th March 2023 has accorded its sanction for the handing over part portion of final plot No. 186 and 187 to the Thane Municipal Corporation while retaining the portion of the land required for maintenance of Tansa pipelines to Municipal Corporation of Greater Mumbai as mentioned in letter dated 23rd March 2023 ;

And whereas, land under trolley road adjacent to final plot No. 186 and 187 as shown in Town Planning Scheme No. 1 is also to be included in notified boundary of Urban Renewal Plan No. 12 ;

And whereas, final plot No. 186 and 187 being adjacent to the notified boundary of Urban Renewal Plan No.12 is proposed to be included in the Urban Renewal Plan No.12 (hereinafter referred as 'the area under proposal') ;

And whereas, as mentioned in the Regulation No. 14.8.1 (ii) (b) of the said Regulations, that Commissioner can prepare and notify Urban Renewal Plan and revise the same, as and when required. Also as mentioned in the said Regulation No. 14.8.1 clause (i) if proposed inclusion is contiguous to Urban Renewal Scheme boundary then the proposed inclusion can be decided / finalized by the Municipal Commissioner ;

Now therefore, as per powers conferred to me *vide* Regulation No. 14.8.1 (ii) (b) of the said Regulations, the notified boundaries of URP No. 12 Kisan Nagar are changed and revised boundary of **URP No. 12 Kisan Nagar (Revised area approx. 142.328 hect.)** is hereby notified.

The plans showing boundaries of revised Urban Renewal Plan area is kept for inspection by general public at following places for next thirty days.

(1) Office of the Deputy Director of Town Planning, Cluster Cell, Majiwada, Thane.

(2) Town Development Department, 4th floor, Thane Municipal Corporation, Thane.

(3) Wagale Ward office.

This notification along with notified plan is also available on website *www.tmctp.thanecity.gov.in*

ABHIJIT BANGAR, I.A.S.,
Commissioner,
Thane Municipal Corporation.

Thane,
Dated 11th May 2023.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.